# आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय


दुरध्वनी – ०२२ – २२६४००८१/८५
०२२ – २२७१ ७५००
फॅक्स – ०२२ २२६४२५५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, जीपीओ जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.


राआअ/ आशानिहाय मानधन माहिती/ /२१
दिनांक १२ ऑक्टोबर २०२१

प्रति,

- मा. आयुक्त, महानगरपालिका, सर्व
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
- मुख्याधिकारी, नगरपालिका / कटकमंडळे, सर्व

विषय – आशा स्वयंसेविकेस अदा केलेल्या मानधनासंदर्भात माहिती सादर करणेबाबत..

संदर्भ – मा. आरोग्य मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ७ ऑक्टोबर २०२१ रोजी दिलेल्या बैठकीतील निर्देश.

राज्यस्तरावर आशा योजनेची अंमलबजावणी सुरु असून योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी कार्यक्षेत्रात आशा आरोग्य सेवा देत आहेत. त्यानुसार आशा स्वयंसेविकेस कामावर आधारित मोबदला अदा करण्यात येतो. ग्रामीण व शहरी आशांना माहिती संकलन व बैठका, कोविड, आरोग्यवर्धिनी (एच.डब्ल्यू.सी), इतर आरोग्य विषयक कार्यक्रमांतर्गत सर्व कामाचा मोबदला अदा केला जातो. आशांना माहिती संकलन व बैठका अंतर्गत चार बाबींकरिता केंद्र शासनाच्या निधीमधून रु. २०००/- दरमहा व राज्य शासनाच्या निधीमधून रु. २०००/- दरमहा असे एकूण रु. ४०००/- मानधन अदा करण्यात येत आहे. मात्र, यामध्ये वैद्यकीय अधिकारी, पीएचसी /युपीएचसी यांनी आशांची दरमहा प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर मासिक सभा आयोजित करावयाची आहे. सदर मासिक सभेत आशांनी उपस्थित राहिल्यास प्रत्येकी रु. १५०/- याप्रमाणे केंद्र शासन व राज्य शासनाच्या निधीमधून असे एकूण रु. ३००/- दरमहा इतका मोबदला अदा करण्यात येतात. मात्र, आशांना पीएचसी /युपीएचसी स्तरावर दरमहा मासिक सभेचा मोबदला प्राप्त होत नसल्याबाबत आशांनी बैठकीत तक्रार केली आहे. त्याअनुषंगाने, मा. आरोग्य मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ७ ऑक्टोबर २०२१ रोजी झालेल्या बैठकीत यावर तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये माहिती दिनांक १३ ऑक्टोबर २०२१ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत dcmasha550@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावी.

12/10

(महेश बोटले)
सहसंचालक (अतांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रत कार्यवाहीस्तव-

- उपसंचालक, विभागीय परिमंडळ, सर्व.
- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
- वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, सर्व
- वैद्यकिय अधिकारी, नगरपालिका, सर्व
- वैद्यकिय अधिकारी, देवळाली, पुणे, खडकी, व देहुरोड, कटकमंडळे
- परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, विभागीय परिमंडळ, सर्व.
- जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा परिषद, सर्व
- शहर कार्यक्रम व्यवस्थापक, महानगरपालिका, सर्व
- जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परिषद, सर्व
- शहर लेखा व्यवस्थापक, महानगरपालिका, सर्व
- जिल्हा समूह संघटक, जिल्हा परिषद, सर्व
- तालूका समूह संघटक, तालूका कार्यालय, सर्व
- तालुका लेखापाल, तालूका कार्यालय, सर्व

# पीएचसी / युपीएचसी स्तरावरील मासिक सभेस आशा उपस्थित राहिल्यास दरमहा रु. ३००/- मोबदल्याची माहिती

| क्र. | जिल्हा/महानगरपालिका/ नगरपालिका /कटकमंडळे | तालुक्याचे नाव | प्राआकेंद्राचे/नागरी प्राआकें. नाव | नियुक्त आशांची संख्या | पीएचसी / युपीएचसी स्तरावरील मासिक सभेस उपस्थित राहिलेल्या आशांची संख्या व देय मोबदला (मासिक सभेत आशांनी उपस्थित राहिल्यास प्रत्येकी रु. १५०/- याप्रमाणे केंद्र शासन व राज्य शासनाच्या निधीमधून असे एकूण रु. ३००/- दरमहा) | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एप्रिल २०२१ | | मे २०२१ | | जून २०२१ | | जूलै २०२१ | | ऑगस्ट २०२१ | | सप्टेंबर २०२१ | |
| | | | | | उपस्थित आशांची संख्या | देय मोबदला | उपस्थित आशांची संख्या | देय मोबदला | उपस्थित आशांची संख्या | देय मोबदला | उपस्थित आशांची संख्या | देय मोबदला | उपस्थित आशांची संख्या | देय मोबदला | उपस्थित आशांची संख्या | देय मोबदला |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |